ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80 Licence No. 175

वर्ष ३८ | पुणे, बुधवार, ५ जानेवारी, १९७२ | अंक १

*" अर्थ "चे ३८ व्या वर्षात पदार्पण*

## "अर्थ"ची राष्ट्रहिताची कामगिरी

कोणत्याही जनसत्ताक राज्यविधानाचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे चालू घडामोडीविषयी समंजसपणा व देशापुढील योजना व ध्येय यांसंबंधी सबोध उत्साह. हे आधारस्तंभ बळकट करण्याची जबाबदारी विशेषतः वृत्तपत्रांवर असते.

सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असतात व सध्याच्या गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजणे त्याला विशेष कठीण असते. त्या समजून घेण्यात त्यांना साहाय्य देणे हे आपल्या "अर्थ"चे कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. *"अर्थ" ही कामगिरी फार उत्कृष्ट रीतीने बजावीत आहे असे मी स्वानुभवावरून,* दृढ *विश्वासाने सांगू शकतो.* योग्य ते लोकसाहाय्य मिळून "अर्थ"ची ही कामगिरी अव्याहत, प्रभावीपणे चालो.

**चिं. द्वा. देशमुख**
रिझर्व्ह बँकेचे पूर्वीचे गव्हर्नर आणि भारताचे पूर्वीचे अर्थमंत्री



## बिगर-बँकिंग कंपन्यांच्या बिगर-तारणाच्या कर्जांवर नवी बंधने

रिझर्व्ह बँकेने दोन नोटिफिकेशन्स काढून बिगर-बँकिंग कंपन्यांच्या बिगर-तारणाच्या कर्जांवर नवी बंधने घालून त्या कर्जांना ठेवींच्या मर्यादेत आणले आहे. १ जानेवारी, १९७२ पासून हे नियम अमलात येणार आहेत. अशा कंपन्यांनी बँकांकडून [illegible] आणि त्यामुळे त्यांना आर्थिक शिस्त पाळायला [illegible] असा त्याचा उद्देश आहे. त्याचप्रमाणे, कंपन्यांच्या गैरव्यवहारामुळे जनतेचे पैसे बुडू नयेत असाही हेतू आहे. अशा कंपन्यांचे डायरेक्टर्स किंवा भूतपूर्व मॅनेजिंग एजंटस आणि सेक्रेटरी-ट्रेझरर्स यांनी हमी घेतलेल्या कंपन्यांकडील बिगर-तारणाची कर्जे त्याचप्रमाणे भागधारकांकडून घेतलेली बिगर-तारणाची कर्जे ह्यांना आतापर्यंत कसलेच बंधन नव्हते. ह्यापुढे मात्र अशी सर्व कर्जे कंपन्यांचे एकूण वसूल भांडवल अधिक मुक्त गंगाजळी वजा साठलेला तोटा ह्यांच्या एकूण रकमेच्या २५% पेक्षा जास्त असता कामा नयेत. कर्जांमध्ये बिगर-तारणाच्या डिबेंचर्सचाही समावेश होतो. भागधारक आणि इतर लोक त्यांच्याकडून घेतलेल्या कर्जांचा ह्यापुढे ठेवींमध्येच समावेश होईल. हायर परचेस आणि हौसिंग फिनॅन्स कंपन्यांना हे नवे कर्जाचे सीलिंग लागू होणार नाही.

ठेवींना जे २५% चे सीलिंग आज लागू आहे, त्यापासून हे नवे सीलिंग स्वतंत्र असून ठेवींवरील विद्यमान सीलिंगमध्ये भर घालणारे आहे. ह्याचा अर्थ, कंपनी आपल्या नेट व भांडवलाच्या मुक्त गंगाजळीच्या २५% इतक्या ठेवी घेऊ शकेल आणि आणखी २५% इतकी बिगर-तारणाची कर्जे घेऊ शकेल. ठेवीप्रमाणे ह्या बिगर-तारणाच्या कर्जांची किमान मुदत १२ महिने राहील.

डायरेक्टरांनी किंवा त्यांच्या भूतपूर्व मॅनेजिंग एजंटस आणि सेक्रेटरी-ट्रेझरर्सनी स्वतः दिलेली (केवळ हमी घेतलेली नव्हे) कर्जास, त्याचप्रमाणे मध्यवर्ती किंवा राज्य सरकारने हमी घेतलेल्या कर्जास सीलिंगमधून वगळण्यात आले आहे.

सीलिंगपेक्षा जास्त कर्जे ज्या कंपन्यांनी घेतली आहेत अशांना ३१ मार्च, १९७५ पर्यंत सीलिंगमध्ये येऊन बसण्याची मुदत देण्यात आली आहे. तीन वार्षिक हप्त्यांत ही गोष्ट त्यांनी घडवून आणली पाहिजे आणि प्रत्येक हप्ता जादा घेतलेल्या कर्जाच्या किमान एक तृतीयांश तरी हवा.

ह्या सर्व तरतुदींमुळे ठेवीदाराला किंवा कर्ज देणाराला प्रत्यक्ष संरक्षण मिळणार नाही, कारण "कंपनीच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करूनच पैसे ठेऊ इच्छिणाऱ्यांनी ठेवी ठेवाव्या" असा रिझर्व्ह बँकेचा स्पष्ट सल्ला आहे.

## तरुण अमली पदार्थांच्या आहारी का जातात ?

दिल्ली विद्यापीठातील विद्यार्थ्यांत अमली पदार्थ अगर औषधे सेवन करण्याच्या सवयी कितपत फैलावल्या आहेत ह्यासंबंधी लोकसभेत माहिती देण्यात आली. ती अशी की विद्यापीठातील विद्यार्थ्यांतील २०० विद्यार्थी ह्या व्यसनाच्या अगदी पूर्णपणे आहारी गेलेले आहेत आणि ५ हजार विद्यार्थी मधूनमधून अशा प्रकारचे निशापाणी करीत असतात पाश्चात्य देशातील विद्यार्थ्यांत अशा घातक सवयी जितक्या पसरल्या आहेत तितक्या हिंदमधील विद्यार्थ्यांत अद्याप तरी पसरलेल्या नाहीत. परंतु वारा कोणत्या दिशेने वाहात आहे ते वरील माहितीवरून दिसून येते. काही समाजशास्त्रज्ञांच्या मताने सध्या शास्त्रीय ज्ञानात व त्याच्या तांत्रिक वापरात फार झपाट्याने प्रगती होत असल्याने सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात एकदम बदल घडून येतो. ह्या बदलाशी जमवून घेणे तरुणांना जमत नाही आणि मग त्यांच्या मनात काळजी आणि भीती ठाण मांडून बसते. भोवतालच्या परिस्थितीच्या कोंडीतून बाहेर पडण्यास आपण असमर्थ आहो असे त्यांना वाटू लागते. स्वतःच्या अगतिकपणामुळे त्यांचे भावनात्मक जीवन विस्कळीत होते. अशा विकल व भकास मानसिक अवस्थेतून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी ते निरनिराळ्या प्रकारची आधुनिक औषधे घेऊ लागतात. खरेखोटे मानसिक समाधान हस्तगत करण्याच्या ह्या सोप्या मार्गावर एकदा पाऊल टाकल्यावर त्याच मार्गावर वाटचाल करीत राहण्याशिवाय त्यांना गत्यंतर राहत नाही. ह्यावर उपाय म्हणून चिंतन-ध्यानाचा कितपत उपयोग होतो त्याचा शास्त्रज्ञ अभ्यास करीत आहेत. मात्र या उपायात बाह्य साधनांचा अवलंब न करता स्वतःच्या मनाचे अनुसंधान करावे लागते.

---

## राणीच्या तनख्यात वाढ

ग्रेटब्रिटनच्या राणीचा वार्षिक तनखा १०६% ने वाढवून तो २ कोटी रुपये करण्यात आला आहे १९५२ सालापासून आजवर तो ९५ लक्ष रु. होता. गेल्या वर्षी राणीचा खर्च तनख्यापेक्षा ५० लक्ष रु. जास्त झाला तो तिने आपल्या इतर उत्पन्नातून भरून काढला. खर्च कमी करण्यासाठी राणीने आपले खाजगी नोकर ७० चे ४६ वर आणले आहेत राजवाड्यातील घड्याळांना किल्ली देण्याचे कंत्राट एक खाजगी फर्मला देण्यात आले आहे. बागेतील फुले आणि भाज्या विकण्यास आरंभ झाला आहे. ह्या सरकारी तनख्याखेरीज राणीचे खाजगी उत्पन्न खूपच मोठे आहे आणि वेगवेगळी सरकारी खाती तिचे वेगवेगळे खर्च चालवितात. राणीची आई, प्रिन्स फिलिप, ड्यूक ऑफ ग्लुसेस्टर, प्रिन्सेस मार्गारेट आणि प्रिन्सेस ॲन ह्या सर्वांचे तनखे वाढविण्यात आले आहेत. "१० लक्ष ब्रिटिश नागरिक बेकार असताना, वेतन वाढ ५% सुद्धा होऊ देण्यास सरकारचा विरोध असताना आणि म्हाताऱ्या पेन्शनरांना उपाशी मरू देऊन सरकार हे तनखे वाढवते तरी कसे ?" अशी विरोधी पक्षाची टीका आहे.




# ☆ अर्थ ☆

बुधवार, ५ जानेवारी, १९७२

संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## अमेरिकन डॉलरचे अवमूल्यन

डॉलरचे अवमूल्यन करणे कमीपणाचे आहे, असा अमेरिकन राज्यकर्ते आणि आर्थिक क्षेत्रातील लोक ह्यांचा समज होता. युरोप आणि जपान ह्यांच्या पुनरुद्धारासाठी केलेले प्रचंड साहाय्य, अमेरिकेची परराष्ट्रातील गुंतवणूक, अमेरिकन प्रवाशांचा परराष्ट्रातील खर्च, अमेरिकेचा इतर खंडातील लष्करी खर्च, ह्या सर्वांमुळे अमेरिकन डॉलर्सचा इतर देशांतील पुरवठा खूपच वाढला होता. अमेरिकेच्या प्रतिस्पर्ध्यांनी बाजारपेठा काबीज करण्यास सुरवात केली, कारण अमेरिकन माल महाग पडू लागला. एका औंसाला ३५ डॉलर ह्या दराने अमेरिकन सोने विकण्यास ते सरकार कायद्याने बांधलेले होते. परकीयांच्याकडे ५,००० कोटी इतके डॉलर साठले होते, तर अमेरिकेत सोने फक्त १,००० कोटी डॉलर्सचे होते. म्हणजे कायदेशीर जबाबदारी पार पाडणे अशक्यच होते. प्रेसिडेंट निक्सनने १५ ऑगस्ट रोजी जाहीर केले की परकीयांच्या डॉलर्सच्या मोबदल्यात ह्यापुढे सोने दिले जाणार नाही. अमेरिकन डॉलरच्या अवमूल्यनाचा आता एवढाच अर्थ आहे की पूर्वी ३५ डॉलरला १ औंस सोने देण्यास अमेरिकेने नकार दिला होता, आता ३८ डॉलरला १ औंस सोने देण्यास अमेरिकेचा नकार आहे.

सोन्याच्या किमतीच्या हिशेबाने अमेरिकन डॉलरचे अवमूल्यन ८·६% एवढे झाले आहे. त्याचा अर्थ इतर चलनांच्या मानाने डॉलर ७·९% एवढा घसरला आहे. ( ३५ पेक्षा ८·६% ने ३८ जास्त आहे, पण ३८ पेक्षा ७·९% ने ३५ कमी आहे ). काही देशांनी आपल्या चलनांची किंमत वाढविली आहे, त्यामुळे ही प्रमाणे थोडीफार बदलली आहेत. उदाहरणार्थ जपानी येनची जुन्या डॉलरच्या मानाने किंमत १७% ने वाढली आहे; प. जर्मन मार्कची १३·५% ने वाढली आहे. फ्रेंच फ्रँक, ब्रिटिश पौंड आणि हिंदी रुपया ह्यांच्या किमती मुद्दाम बदललेल्या नाहीत, म्हणजे डॉलरच्या मानाने ८·६% जास्त होतील.

ह्या अवमूल्यनामुळे अमेरिकन निर्गतीच्या किमती कमी होतील, तर अमेरिकेत आयात होणारा माल महाग होईल. त्यामुळे परराष्ट्रीय व्यापारात गेली २० वर्षे येत असलेली तूट ह्यापुढे येणार नाही; येत्या २– ३ वर्षात ३०,००० ते ७०,००० नवे रोजगार निर्माण होतील. अमेरिकनांचा परदेश–प्रवास महाग होईल तर परदेशीयांना अमेरिकेत प्रवास करणे स्वस्त वाटेल.

## भारतीय रुपयाचे छुपे अवमूल्यन

भारताने पौंडाशी आपले नाते कायम ठेवले असून 'विद्यमान रुपया–स्टर्लिंग पौंड' चा दर चालू ठेवण्याचे ठरविले आहे. ह्याचा अर्थ १ स्टर्लिंग पौंड =१८·९६७७ रुपये आणि १ डॉलर= ७·२७९ असे हुंडणावळीचे दर झाले आहेत. सरकारी घोषणेत 'विद्यमान दर' असे शब्द आहेत; 'अधिकृत दर' असे शब्द नाहीत, कारण अधिकृत दरापेक्षा विद्यमान दर वेगळे असून खरोखर पौंडाच्या हिशेबात रुपयाचे ५·३३% अवमूल्यन झालेले आहे; त्यामुळे डॉलरच्या हिशेबात रुपयाचे सुमारे ३% पूनर्मूल्यन झालेले आहे. ज्या देशांनी आपल्या चलनाचे पुनर्मूल्यन केले आहे, त्यापैकी जर्मन मार्कच्या हिशेबात रुपयाचे १०% आणि जपानी येनच्या हिशेबात १३% अवमूल्यन झाले आहे.

रिझर्व्ह बँकेने रुपयाचे डॉलरशी लग्न लावले होते, पण आता मात्र चलनाचा बाजारभाव लक्षात घेऊन त्याप्रमाणे रुपया-पौंड नाते कायम ठेवले आहे असे सांगून रुपयाचे अवमूल्यन दडविले जात आहे, अशी टीका करण्यात आली आहे. रुपयाच्या या छुप्या अवमूल्यनामुळे भारतातील आयातीच्या किमती वाढतील पण निर्गतीस पुरेसे उत्तेजन मिळणार नाही, असेही मत व्यक्त करण्यात आले आहे.

## तुटीची अर्थव्यवस्था प्रमाणाबाहेर ?

चालू उत्पन्नातून खर्च भागत नाही, म्हणून सरकार नोटा काढून प्रसृत करते, त्याला तुटीचा अर्थव्यवस्था म्हणतात. १९६९–७० मध्ये सरकारने अशा रीतीने ५८ कोटी रुपयांची 'व्यवस्था' केली. १९७०–७१ मध्ये योजनाखर्च वाढविल्यामुळे ३६५ कोटी रुपयांचा खर्च अशा 'व्यवस्थे'ने भागवावा लागला. चालू वर्षात २८३ कोटी रुपयांची तरतूद तुटीच्या अर्थव्यवस्थेत करण्यात आली आहे. येत्या दोन वर्षात दरसाल २०० कोटी रु. पेक्षा अधिक नोटा काढून तूट भागविली जाणार नाही असे गृहीत धरले तरी चौथ्या योजनेत नोटा काढून अर्थव्यवस्था करावयाच्या खर्चाची रक्कम १,२०० कोटी रु. भरेल. ह्याचा अर्थ, एवढी चलनवाढ झाल्यामुळे साहजिकच महागाई वाढत जाते. नियोजन मंडळाने ह्या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

### पाकिस्तानच्या आर्थिक सामर्थ्याला जबर तडाखा

जनरल याह्याखान ह्यांची पाकिस्तानच्या अध्यक्षपदावरून उचलबांगडी करून अधिकारावर आलेले श्री. झेड. ए. भुत्तो ह्यांनी नवा पाकिस्तान निर्माण करण्याची कसम खाल्ली आहे. मात्र त्याच्या निर्मितीसाठी लागणारे सामर्थ्य त्यांच्याजवळ नाही. पूर्व बंगालच्या मुक्तिवाहिनीने हिंदी लष्कराच्या मदतीने बांगला देशाची स्थापना केली. त्यामुळे पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला जबर तडाखा बसला आहे. पाकिस्तानने गमावलेल्या उत्पादक मालमत्तेची यादी फार मोठी आहे. ती अशी : तेलशुद्धीचा एक कारखाना; त्याची वार्षिक उत्पादनक्षमता १५ लाख टनाची होती. पोलाद निर्मितीचा एक कारखाना, १॥ लाख टन उत्पादनक्षमतेचा; २९ तागाच्या गिरण्या, २२ कापडाच्या गिरण्या, ७ साखरकारखाने, २८ अल्युमिनमचे कारखाने, एक रासायनिक खताचा कारखाना, एक कागदाची गिरणी, एक सिमेंटचा कारखाना आणि एक यांत्रिक हत्यारांचा कारखाना. पाकिस्तान अभंग होता तेव्हा त्याला समुद्रमार्गे दळणवळण ठेवण्यासाठी ३ बंदरे होती. आता फक्त कराची बंदरावर अवलंबून राहावे लागेल. पूर्व बंगालमध्ये रस्ते व रेल्वेमार्ग उघडण्याच्या कामी पाकिस्तानच्या कोणत्याच सरकारने लक्ष दिलेले नव्हते. त्यामुळे ह्या बाबतीत झालेली हानी फारशी नाही. परदेशीय चलनाच्या प्रांतीत मात्र खूप नुकसान होईल. १९६८–६९ मधील आकड्यांवरून असा अंदाज करण्यात आला आहे की पाकिस्तानचे परदेशीय हुंडणावळीचे उत्पन्न दर साल १४० कोटी रुपयांनी घटेल. हुंडणावळीच्या एकूण उत्पन्नाच्या ४५ टक्के एवढी ही रक्कम आहे.

### लष्करी अधिकाऱ्यांच्या कुटुंबांची परीक्षा

युद्धाच्या कथा रम्य असतात खऱ्या; पण लष्करी अधिकाऱ्यांच्या पत्नींना मात्र तशा नसतात. वरवर हसून त्या आपली कर्तव्ये पार पाडत असल्या तरी आत कोठे तरी भयाची कातरता त्यांना जाणवत असते. कारण, त्यांचे यजमान दूर कोठे तरी आघाडीवर लढत असतात. काहींनी आपल्या पतीला तीन–चार वर्षे पाहिलेले नसते. अशा वेळी काही तरी उद्योग मागे लावून घेऊन त्यांना काळ काढावा लागतो. मग काहीजणी संरक्षक दलातील जवानांसाठी चालविलेल्या शाळांत शिकविण्याचे काम करतात. पती आघाडीवर गेलेल्या अनेक स्त्रियांना आपली ठिकाणे सोडता येत नाहीत. तसे केल्यास मुलांच्या शिक्षणात खंड पडतो आणि जीवन विस्कळीत होतो. अशा बहुतेक स्त्रिया बहुधा रोज कोठेतरी जमतात आणि ताज्या वार्तांचा समाचार घेतात. एखादीला आपल्या पतीकडून पत्र आलेले असते. मग निदान तो दिवस तरी आनंदात जातो. एखादी अस्वस्थ झालेली दिसली तर इतरजणी तिचे मन रिझविण्याचा प्रयत्न करतात. पण तरीही डोक्यावर टांगलेल्या तरवारीची सततच जाणीव असते. कितीही उद्योग मागे लावून घेतला तरी काही वेळ रिकामा राहातोच; मग मात्र रिकाम्या वेळात हुरहूर लागल्याशिवाय राहात नाही. खंबीर मनाची एखादी वीरपत्नी म्हणते. "मला तशी भीती वाटत नाही. त्यांना जर दीर्घायुष्य असले तर ते कोठल्याही धोक्यातून वाचून परत येतील. सैनिकी पेशामुळे फारसा फरक मुळीच पडत नाही. नागरी जीवनात सुद्धा पुष्कळजण अपघातात दगावतात. अखेर हा सर्व नशिबाचा खेळ आहे. निर्भयवृत्तीने व स्वतंत्रपणे जगण्यास शिकणे हेच खरे."

### विकसनशील देशांना परदेशीय मदत पाहिजे

विकसनशील देशांना आपली गरिबी दूर करण्यासाठी परदेशी भांडवलाची जरूर लागते. कारण, त्या देशात भांडवलाचा संचय होण्यास अतीव दारिद्र्याचा कायमचा अडथळा होत असतो. दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आणि आफ्रिकेतील अनेक छोटे-मोठे देश स्वतंत्र झाले. तेव्हा त्यांना आपल्या आर्थिक विकासाची गरज तीव्रतेने भासू लागली. पण राजकीय दास्यातून नुकत्याच सुटलेल्या ह्या देशांचा त्यांच्या पूर्वीच्या परदेशीय राज्यकर्त्यांचा अनुभव कटू होता. अर्थातच परदेशांकडून आर्थिक मदत घेण्याच्या बाबतीत त्यांच्या मनात शंकाकुशंका निर्माण होत असत. पण, आता काळ पालटलेला आहे. टोकिओ येथे संयुक्त राष्ट्रसंघटनेची परदेशी भांडवल गुंतवणुकीविषयी एक परिषद भरविण्यात आली होती. ह्या परिषदेला सुधारलेल्या व मागासलेल्या २५ देशांचे प्रतिनिधी हजर होते. भारतानेही परिषदेत भाग घेतला होता, परिषदेत व्यक्त करण्यात आलेल्या विचारांवरून असे दिसून आले की मागासलेल्या देशांची जी वासाहतिक पिळवणूक झाली होती तिच्या परिणामापासून ते आता खूपच सावरले आहेत. परदेशी भांडवलाची आता त्यांना पहिल्याइतकी भीती वाटत नाही. उलट, परदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीला उत्तेजन देण्याची गरज त्यांना पटलेली आहे. मात्र गुंतवणुकीच्या पद्धतीत त्यांना बदल हवा आहे. भांडवल देणाऱ्या व भांडवल घेणाऱ्या देशांनी संयुक्त मालकीचे औद्योगिक प्रकल्प काढावे, उभयता देशांनी त्यातील नफा आणि धोका ह्यांची जबाबदारी घ्यावी, असा जोरदार मतप्रवाह परिषदेत दिसून आला. विकसनशील देशात खाजगी मालकीच्या भांडवल गुंतवणुकीविषयी मार्गदर्शक तत्त्वे ठरवून देण्याच्या कामाला सुरवात करण्यात आली. परिषदेच्या सूचना संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे पाठविण्यात येतील.

### कुटुंबनियोजनाचा प्रचार मोठा पण शस्त्रक्रियांत वाढ नाही

कुटुंबनियोजनाच्या प्रचारामुळे कुटुंबनियोजनाची आवश्यकता पटण्यास मदत झाली असली, तरी कुटुंबनियोजनाची साधने मात्र अपेक्षेप्रमाणे आणि उद्दिष्टाप्रमाणे वापरली जात नाहीत, असे आढळून आले आहे. निर्बिजीकरणाच्या शस्त्रक्रियांची संख्या गेल्या कित्येक वर्षांत वाढलेलीच नाही.

## तुटीचा अर्थभरणा-मर्यादेपलीकडे जाण्याची शक्यता

तुटीचा अर्थभरणा मर्यादेपलीकडे जाईल अशी भीती व्यक्त करण्यात येत होती. ही भीती निराधार नव्हती असे आता आढळून येत आहे. कार्यक्रमाच्या सर्व वर्षात मिळून ८५० कोटी रुपयांचा भरणा करावा लागेल असा अंदाज होता. परंतु पहिल्या तीन वर्षाच्या अवधीतच ही मर्यादा ओलांडली जाईल अशी लक्षणे दिसू लागली आहेत. १९६९–७० ह्या कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षी तुटीचा अर्थभरणा बेताचा होता. फक्त ५८ कोटीवरच भागले होते. परंतु १९७०–७१ ह्या वर्षी ह्या रकमेत एकदम खूप मोठी वाढ होऊन २६५ कोटीपर्यंत तुटीचा भरणा करावा लागला. ह्या वर्षात योजनेतील कामावर होणाऱ्या खर्चात बरीच वाढ झाली आणि योजनेबाहेरील खर्चानेही अशीच मोठी उडी घेतली. साधनसामग्री मिळविण्यात अगर एकत्रित करण्यात मात्र त्या मानाने यश प्राप्त झाले नाही. चालू आर्थिक वर्षात तुटीच्या अर्थभरण्याची रक्कम ३८० कोटीच्या घरात गेली असावी असा अंदाज आहे. पूर्व बंगाल मधुन आलेल्या निर्वासितांवर करावा लागणारा खर्च आणि पाकिस्तानशी झालेल्या युद्धाचा खर्च लक्षात घेतला, तर तुटीच्या अर्थभरण्याची मर्यादा ४८० कोटी रुपयापर्यंत जाणे अशक्य मानता येणार नाही. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात तुटीच्या अर्थभरण्याची जी मर्यादा घालण्यात आली होती ती पहिल्या तीन वर्षातच ओलांडली जाऊन ८७५ कोटी रुपयापर्यंत जाईल. म्हणजे २५ कोटी रुपयांनी ती अधिकच होईल. अर्थातच आर्थिक नियोजनाबद्दल जबाबदार असणाऱ्यांना ह्या परिस्थितीबद्दल चिंता वाटू लागली आहे. परिस्थिती काबूत ठेवण्यासाठी अनेक उपायांचा विचार करण्यात येत आहे.

तुटीच्या अर्थभरण्यामुळे चलनवाढीला नेहमीच उत्तेजन मिळत जाते असा अनुभव आहे. त्यामुळे चौथ्या योजनेच्या शेवटच्या दोन वर्षात करावयाच्या खर्चात कितपत वाढ करता येईल ह्यासंबंधी अनिश्चितता उत्पन्न झाली आहे. नियोजन समितीने असा स्पष्ट इशारा दिला आहे की तुटीचा अर्थभरणा अशाच वेगाने करण्यात येऊ लागला तर देशातील किमतीचे चित्र पार उलटेपालटे झाल्याशिवाय राहणार नाही. गेल्या काही महिन्यात किमती वाढण्याची प्रक्रिया सातत्याने दिसून येत आहे ही गोष्ट ह्या संदर्भात लक्षात ठेवली पाहिजे. कार्यक्रमातील कामात होणाऱ्या खर्चात जर वाढ करावयाची असेल तर चलनवृद्धीला उत्तेजन न देणाऱ्या उपायांच्या मार्गानी अधिक साधनसामग्री उभारणे एवढाच पर्याय शिल्लक राहतो. परंतु अशा रीतीने पैसा गोळा करण्यास फारसा वाव राहिलेला नाही. राज्यसरकारे नवीन कर बसवून पैसा जमा करण्यास फारशी तयार नाहीत. कारण नवे कर सरकारला अप्रियताच मिळवून देतील हे उघड आहे. परदेशीय व्यापारातील देण्याघेण्याच्या व्यवहारातही एकंदरीने मोठी प्रतिकूल तफावत पडेल असा संभव आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस जितकी तफावत पडेल अशी अपेक्षा होती त्यापेक्षा बरीच अधिक म्हणजे ४६५ कोटींची तफावत पडेल अशी चिंता वाटू लागली आहे. १९६९–७१ ह्या दोन वर्षात देण्याघेण्यातील तफावत सुमारे १,७०४ कोटी रुपयांची दिसून आली आहे. ही प्रवृत्ति अशीच चालू राहीली तर चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस तफावतीचा आकडा फुगून २,८०० कोटी रुपयांच्या दारात जाईल. कार्यक्रमाच्या उरलेल्या तीन वर्षात जरूर तितकी परदेशीय मदत मिळाली नाही तर गंगाजळीतून परदेशीय चलन उचलावे लागेल अगर आयातीच्या कार्यक्रमात काटछाट करावी लागेल.

---

## परदेशी मदतीशिवाय पुन्हा युद्ध अशक्य



बांगला देश स्वतंत्र झाल्यानंतर पाकिस्तानचे अध्यक्ष म्हणून कट्टर भारतद्वेष्ट्या भुत्तोंनी अधिकारग्रहण केला आहे. त्या नंतर त्यांनी केलेल्या पहिल्याच भाषणात भारतावर सूड घेण्याची घोषणा त्यांनी केली आहे. बदललेल्या परिस्थितीत पाकिस्तानला भारताविरुद्ध पुन्हा युद्ध करणे कितपत शक्य आहे ह्या विषयी कर्नल रामराव ह्या लष्करी तज्ज्ञाने विवेचन केले आहे. कर्नल रामराव इन्स्टियूट ऑफ डिफेन्स स्टडीज ह्या संघटनेतील अधिकारी आहेत. ते असे म्हणतात की आणखी दोन वर्षे तरी पाकिस्तान भारताविरुद्ध युद्धाचे शिंग फुंकू शकणार नाही. अमेरिका आणि चीन ह्यांनी पाकिस्तानला लष्करी मदत केली तरच असे करणे पाकिस्तानला शक्य होईल. अमेरिका व चीन ह्यांच्याकडून मिळणाऱ्या संभाव्य मदतीशिवाय पाकिस्तानमधील राजकारणी लोक आणि लष्करी अधिकारी त्या देशाची युद्ध-यंत्रणा पुनर्घटित करण्याच्या कामात कितपत यशस्वी होतात ह्यावरही बरेचसे अवलंबून आहे. कारण नुकत्याच झालेल्या युद्धात पाकिस्तानच्या लष्कराला, आरमाराला आणि हवाई दलाला फार मोठा मार खावा लागलेला आहे. लष्कराची पुनर्घटना करताना पाकिस्तानला नुकतीच झालेली हानी तर भरून काढावी लागेलच पण त्याशिवाय आणखी दोन डिव्हिजन सैन्यही नव्याने उभारण्याचे प्रयत्न करावे लागतील. ह्या नव्या लष्कराला किमान एक वर्ष तरी प्रशिक्षण द्यावे लागेल. बंगला देशामध्ये सुमारे ९० हजार सैनिक अगर निमसैनिक शरण आले आहेत. त्यांपैकी ४० हजार नियमित सैनिक आहेत. त्यांपैकी अनेक अधिकाऱ्यांना व सैनिकांना निवृत्त करण्यात येईल ह्यात शंका नाही.

पाकिस्तानच्या दृष्टीने नुकतेच झालेले युद्ध निर्णायक म्हणता येणार नाही. पूर्व बंगालमध्ये फार मोठे सैन्य शरण गेले आणि पश्चिम आघाडीवर पाकिस्तानला संरक्षक पवित्राच घ्यावा लागला. युद्धबंदी विनशर्त स्वीकारावी लागली हेही खरे. परंतु तरीही पाकिस्तानची युद्ध करण्याची शक्ती पूर्णपणे नाहीशी झाली असे म्हणता येत नाही. अजूनही पाकिस्तानजवळ १,००० रणगाडे सुस्थितीत आहेत. ८ डिव्हिजन सैन्यही अजून खडे आहे.

पाकिस्तानच्या पुढाऱ्यांना अजूनही पराभव झाला असे वाटत नाही. उलट, पराभव झाला नाही हे दाखविण्यासाठी त्यांनी युद्धबंदी स्वीकारली असण्याचा संभव आहे. युद्धानंतर उरलेली लष्करी शक्ती त्यांना लोकांपुढे मिरविता आली तरच पाकिस्तानचा पराभव झालेलाच नाही असा लोकांचा ग्रह करून देता येणे शक्य होणार आहे. भारताच्या लष्करी अधिकाऱ्यांनी आपले काम चोख बजावले. त्याचबरोबर हवाई दल, नौदल आणि सेना ह्यांनी एकमेकांशी उत्कृष्ट सहकार्य केले त्यांच्यातील परस्पर समजुतीमुळे शत्रूवर जबरदस्त घाव वेळीच घालणे शक्य झाले म्हणूनच भारताचा विजय शक्य झाला. तथापि एवढ्यानेही सर्व कार्यभाग झाला असे म्हणता येणार नाही. पाकिस्तानी लष्करांतील सैनिकांचे मनोधैर्य कमी प्रतीचे होते आणि त्यांचा आत्मविश्वासही बेताचा होता. पुन्हा युद्ध झाले तर पाकिस्तानच्या लष्करी डावपेचांत फारसा बदल होण्याची शक्यता नाही. शत्रूचे लष्कर पुन्हा काश्मीर जिंकून घेण्याचा प्रयत्न करील. परंतु हा प्रयत्न स्वप्नासारखा कोलमडून पडेल, हीच शक्यता अधिक. अमेरिका आणि चीन ह्यांनी सक्रिय पाठिंबा दिला तरच पाकिस्तानचा पराभव टळेल.

### युद्धकाळात रेल्वेने बजावलेली कामगिरी

समरांगणावर लढणाऱ्या फौजांना अनेक प्रकारचा पुरवठा एकसारखा करावा लागतो. दारूगोळा, अन्न, औषधे, शस्त्रास्त्रे, इत्यादींचा सतत पुरवठा वेळेवर झाला नाही तर जगांतील सर्व शक्तिशाली लष्करही पराभूत झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच युद्धाची चाहूल लागताच आणि नंतर ते प्रत्यक्ष सुरू झाल्यावर वाहतुकीच्या साधनावर खूप ताण पडतो. त्यातही अवजड सामानसुमान वाहून नेण्यासाठी रेल्वे मार्गांचाच अधिक उपयोग होत असल्याने युद्धातील यशापयशाचे भवितव्य रेल्वेच्या कामगिरीवर बरेच अवलंबून असते. नुकत्याच झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धात रेल्वेने आपली कामगिरी चोख बजावली पूर्व आघाडी व पश्चिम आघाडी दोन्ही युद्धक्षेत्रातील पुरवठा करण्याची जबाबदारी रेल्वेने चोखपणे पार पाडली. लष्कर आणि त्याला लागणारी सामग्री ह्यांची फार मोठ्या प्रमाणावर वाहतूक करण्याचे दिव्य व्यवस्थित पार पाडण्यात आले. सप्टेंबरच्या १ तारखेपासून १६ डिसेंबरपर्यंत रेल्वेच्या निरनिराळ्या विभागात मिळून १७५९ खास गाड्या सोडण्यात आल्या. एका महिन्यात तर सर्वात अधिक म्हणजे ६९७ रेल्वे गाड्या सोडण्यात आल्या. डिसेंबर महिन्याच्या पहिल्या सोळा दिवसांत म्हणजे युद्धबंदी जाहीर होईपर्यंत ३९१ खास गाड्या सोडण्यात आल्या. त्याशिवाय रुग्णवाहिका गाड्या आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी आणीबाणीच्या वेळी सोडलेल्या गाड्या वेगळ्याच. लष्करी गाड्या सोडून लष्कराला लागणारा अनेक प्रकारचा माल मधून मधून खास व्यवस्था करून वाहून नेण्यात आला. पूर्व व पश्चिम आघाडीवर वाहतूक करण्याच्या रेल्वे गाड्यांना शत्रूच्या हल्ल्यामुळे नुकसान सोसण्याचा प्रसंग आला नाही हे विशेष.




इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग–सांगली (महाराष्ट्र)

फोन : २११ तार : Vijayplow

# आपल्या कापडधंद्याचे दुखणे

## कापूस तुटवड्याचा प्रश्न

( अनंतराव रामचंद्र भिडे, चेअरमन,
दि डेक्कन को. स्पिनिंग मिल्स लि. )

कापडधंदा हा आपल्या देशातील सर्वात मोठा संघटित धंदा असून जगात त्याचा अमेरिका व चीन यांच्या खालोखाल तिसरा नंबर लागतो. आंतरराष्ट्रीय कापड व्यापारात त्याचा दुसरा नंबर येत असून भारतासाठी परकीय चलन मिळवून देणारा हा तिसऱ्या क्रमांकाचा धंदा आहे. सूत व कापड गिरण्यात एकंदर १९.१ दशलक्ष चात्या व २.०८ लक्ष यंत्रमाग इतकी स्थापित क्षमता आहे. भारतातील एकूण कामगारांच्यापैकी २० टक्के लोकांना, म्हणजेच ९ लाखांपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना या धंद्यात रोजगार मिळतो. तसेच राष्ट्रीय कोषात सूत व कापडावरील अबकारी कराच्या स्वरूपात दर साल १३० कोटी रुपये जमा होतात. असा हा कापड धंदा सांप्रत शोचनीय परिस्थितीत असून त्यावर कापूस, स्टोअर्स व पगार इत्यादी खर्चात झालेल्या भरीव वाढीमुळे प्रखर आघात झाला आहे. कापसाच्या भावात सालोसाल गंभीर स्वरूपाची वाढ होत असून त्यामुळे उत्पादनाचे एकंदर अर्थशास्त्र उलटे होत आहे. अहवालसाली कापसाच्या भावात अभूतपूर्व तेजी झाली. वाढता पगार-खर्च, वाढीव व्याज, तसेच स्टोअर्स, मशिनरीवरील खर्च, या सर्वांच्या कात्रीत नफ्याचे प्रमाण पिळवटले गेले आहे व त्यामुळे कापडधंद्याची साधनसंपत्ती अधिकच खालावली आहे. कापडगिरण्यांना होणारा पतपुरवठा रोखल्यामुळे कापूस टंचाई असतानासुद्धा न विकलेल्या कापूस साठ्यांचा प्रश्न विरोधाभासात्मकरीत्या उपस्थित झाला आहे. खालच्या पातळीवरील उत्पादन-क्षमता हे सुद्धा उत्पादन खर्च वाढीचे कारण असून चांगल्या व्यवस्थापनामुळे त्यावर सुपरिणाम होईल. भारतातील कामगारांची उत्पादनक्षमता बरीच कमी असून ती सुधारण्यासाठी आधुनिक यंत्रसामग्री, चांगल्या दर्जाचा कच्चा माल, इतर सोयी, पुरेसे प्रशिक्षण, योग्य वेतन धोरण, उत्तेजक योजना, सामाजिक सुरक्षा व कल्याणबाबी, यांचा उपयोग केला पाहिजे

राहणीमान निर्देशांक दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे कापडधंद्यावरील भार जड होत आहे. तरीसुद्धा ट्रायब्यूनल्स व वेतन मंडळे वेतनाची उत्पादनक्षमतेशी सांगड घालू शकली नाहीत. महागाई भत्त्यासह सर्व वेतन कोणत्या ना कोणत्या तऱ्हेने उत्पादनक्षमतेशी निगडित केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. जितक्या लवकर वेतनाची उत्पादनक्षमतेशी सांगड घातली जाईल तितके कापडधंद्याच्या दृष्टीने चांगले होईल. नित्य वाढणाऱ्या खर्चामुळे निर्यात व्यापारावर बराच विपरीत परिणाम झाला आहे. याशिवाय चीन व हाँगकाँगमध्ये निर्माण होणाऱ्या स्वस्त कापडाबरोबर आपल्या देशाला नजीकच्या काळात तीव्र चढाओढ करावी लागेल. दीर्घ-कालीन विचार करता खास सवलती, रालीव कोटे व प्रलोभने यांच्या साहाय्याशिवाय भारताचा कापड निर्यात व्यापार चालला पाहिजे. यासाठी देशातील कापडधंद्याचे आधुनिकीकरण व कापूस उत्पादन वाढीची योजना यांची आवश्यकता आहे. निर्यात व्यापारावर अवलंबून असणाऱ्या कापड गिरण्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी सहा कलमी योजना सरकारने नुकतीच मांडली आहे. पाच वर्षांवर विभागल्या गेलेल्या महत्त्वाकांक्षी आधुनिकीकरण कार्यक्रमानुसार कापडधंद्याला सवलतीच्या व्याज दराने १०० कोटी रुपयांच्या कर्जाची गरज आहे. सुतावरील व कापडावरील अबकारी कराच्या स्वरूपात सरकारी तिजोरीत दर साल जमणाऱ्या १३० कोटी रुपयांपैकी ५० कोटी रुपये सरकारने राखून ठेवल्यास आधुनिकीकरण विनासायास करता येईल. नवीन सुधारणा करण्यासाठी व मशिनरी देण्यासाठी कापड गिरण्यांना मनूभाई शहा कमिटीच्या शिफारशीनुसार कमी व्याजाच्या दराने दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देणे अगत्याचे आहे.

देशातील ६६० गिरण्यांपैकी १०० गिरण्या कमजोर असल्यामुळे कापडउद्योगधंद्यावर परिणाम करणाऱ्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करणे जरूर आहे. याशिवाय ३५ सूत गिरण्या व ११५ कापड गिरण्या अशा एकंदर १५० गिरण्या आजारपणाच्या सीमारेषेवर ठाकल्या आहेत. म्हणून गिरण्या बंद पडणे रोखण्यासाठी खालील उपाययोजना करणे जरूर आहे :—

( १ ) कापसाच्या तारणावर देण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याच्या संदर्भात २० टक्क्यांपेक्षा जास्त मार्जिन ठेवू नये.

( २ ) खेळत्या भांडवलाची गरज भागविण्यासाठी गिरण्यांना पतपुरवठा मर्यादा वाढवून दिल्या पाहिजेत.

( ३ ) योग्य पातळीवर येतील इतके व्याजाचे दर कमी केले पाहिजेत.

( ४ ) निर्यात पत-पुरवठ्यावर ६ टक्क्यांपेक्षा जादा दराने व्याज आकारले जाऊ नये.

भारतीय कापडधंदा व्यवस्थापकांनी अपयशाची अवांतर कारणे शोधीत न बसता शास्त्रीय बुद्धिमत्तेचा योग्य उपयोग करून घेतला पाहिजे. अस्तित्व टिकविण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.

यंत्रमाग धंद्याचा विचार करता सुताच्या, विशेषतः मिडियम व कोर्स काउंटच्या, भावातील तेजीमुळे या धंद्यातील मुळातच कमी असलेले नफ्याचे प्रमाण एकदम घटले आहे. याशिवाय राजकीय अस्थिरता व कापड बाजारातील मंदीचे वातावरण यांमुळे यंत्रमागावरील कापडाचा उठाव फारसा समाधानकारक

नाही. म्हणून यंत्रमाग धंदा मंदीच्या खाईत सापडला आहे. सरकारने यंत्रमाग धंद्याला सुताचा पुरेसा पुरवठा व पतपुरवठ्याच्या सोयी उपलब्ध करून देऊन जरूर ती मदत केली पाहिजे. यंत्रमागावर रंगीत साडीचे विणकाम करण्यावर घालण्यात आलेली बंदी सत्वर उठविण्यात यावी.

यंत्रमाग धंद्यानेसुद्धा टेरिकॉट वगैरे मिश्र धाग्यांच्या कापडाचे उत्पादन करण्यासाठी यंत्रमागात जरूर ती सुधारणा केली पाहिजे. असे न केल्यास या धंद्याचा भविष्यकाल उदासमय जाईल.

कापसाचा तुटवडा हा कापड उद्योगधंद्याचा एक प्रमुख प्रश्न आहे. गेल्या काही वर्षांत कापसाचे उत्पादन ५६ लक्ष गासड्या इतकेच कुंठित राहिले आहे. सन १९७०–७१ सालातील कापूस उत्पादनाचा दुरुस्त अंदाज फक्त ५२ लक्ष गासड्यांचा असून कापसाचा वापर सुमारे ६४ लक्ष गासड्या इतका भरेल. त्यामुळे कापसाची मागणी व पुरवठा यांतील तफावत वाढत आहे. आतापावेतो ११·५५ लक्ष गासड्यांचे कापूस आयात परवाने सरकारने दिले असून यानंतर अधिक कापूस आयातीसाठी जागतिक बाजारपेठेत शिरणे फारसे फायदेशीर ठरणार नाही. कापूस पिकाचे अंदाज वेळेवर उपलब्ध करून देणारी यंत्रणा सरकारने निर्माण केल्यास कापसाच्या भावात होणारे वाढते चढउतार कमी करणे शक्य होईल. तसेच आयातीची आखणी वेळेवर करता आल्याने परदेशीय चलनाची पण बचत होऊ शकेल. देशातील अपुऱ्या कापूस पिकामुळे निर्माण झालेली असमतोल परिस्थिती आयातीची चांगली आखणी करून थोडी फार सुधारता येईल. देशांतर्गत कापूस उत्पादन जर ५६ लक्ष गासड्या इतकेच स्थिर राहिले तर कापूस आयातीवर कराव्या लागणाऱ्या खर्चाची मजल सुमारे २५० कोटी रुपये इतकी वाढेल. प्रत्यक्ष कृती अभिप्रेत असलेली कापूस विकास योजना कार्यान्वित करण्यात लागणारी जरूर ती पावले टाकली न गेल्यास, येत्या काही वर्षांत कापूस तुटवड्याचा प्रश्न अधिकच उग्र होईल अशी भिती वाटते. कापसाच्या अल्प उत्पादनाला कारणीभूत असलेले दोन घटक पुढीलप्रमाणे आहेत :–

(१) ८५ टक्के कापूस पीक पावसावर अवलंबून आहे.

(२) ९९ टक्के कापूस लागवड क्षेत्रात कमी उत्पादन येणाऱ्या कापसाच्या जातींची लागवड होते.

कापूस उत्पादनवाढीसाठी गेल्या १० वर्षांत निरनिराळे उपाय योजूनसुद्धा दर एकरी कापूस उत्पादनात फक्त १० पौंड इतकी अत्यल्प वाढ झाली आहे. जमिनीतील आर्द्रता योग्य पातळीवर राखणे, खतांचा उचित वापर करणे, जमिनीचा कस वाढविणे, कापूस पीक संरक्षण उपाय योजणे, इत्यादींमुळे कापूस-उत्पादन प्रमाण सुधारू शकेल. चांगल्या प्रतीच्या बियाण्यांचा वापर, चांगली लागवड व खुरपणी, रोगप्रतिबंधक उपाययोजना, खतांचा व कीटक नाशकांचा योग्य वेळी प्रमाणशीर उपयोग करणे, इत्यादी गोष्टीसुद्धा उत्पादन प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. कापसाचे उत्पादन दर हेक्टरला १८० किलो इतके न वाढल्यास कापसाच्या लागवडीखाली असलेल्या ८ दश लक्ष हेक्टर जमिनीतून ८० लक्ष गासड्यांचे कापूस उत्पादन उद्दिष्ट साध्य होणार नाही. शास्त्रीय संशोधनाचा वा उत्पादनवाढीच्या इच्छेचा अभाव हे कापूस विकास कार्यक्रमाच्या मंदावलेल्या प्रगतीचे कारण नसून आर्थिक साहाय्याची कमतरता हेच खरे कारण होय. परंतु कापूस विकास कार्यक्रमासाठी जादा रकमेची तरतूद करण्यासंबंधी सरकारकडे वारंवार केलेली मागणी सफल झालेली दिसते. कापूस उत्पादन वाढीसाठी सरकारने १४·७४ कोटी रुपये रकमेची तरतूद नियोजित केली असून त्यापैकी १९७१–७२ या वर्षी ४·२६ कोटी रुपये खर्च होणार आहेत. ही योजना मान्य होऊन प्रत्यक्षात कार्यान्वित झाल्यास कापूस पिकात ५ लक्ष गासड्यांची भर पडेल. दर एकरी निघणाऱ्या कापूस उत्पादन प्रमाणातील वाढीमुळे कापडधंद्यात आमलाग्र बदल घडून येईल. उत्पादनखर्च कमी करता आल्याने नफ्याचे प्रमाण सुधारेल व आधुनिकीकरणासाठी लागणारे भांडवल निर्माण होईल.

आयात करण्यात येणाऱ्या अमेरिकन कापूस जातीचा गुजरात-६७ या देशी कापूस जातीबरोबर संकर घडवून आणल्याने एक नवीन कापूस जात उपलब्ध झाली आहे. त्यामुळे कापूस टंचाईची कोंडी फोडली जाणार याबद्दल आनंद होतो. बल्लारी जिल्ह्यात हायब्रीड-४ नावाच्या या नवीन जातीपासून दर हेक्टरला ८७ क्विंटल कपाशीच्या उत्पादनाचा उच्चांक गाठण्यात आला आहे. ३५ ते ४० क्विंटल कपास इतके या जातीच्या बागाईत क्षेत्रात सरासरी उत्पादन असून ते इतर जातींच्या चौपटीहून अधिक भरते. कमी वेळात जादा उत्पादन देणाऱ्या पी. आर. एस.–७२ व पी. आर. एस.–७४ या दोन नवीन कापूस जाती कोईमतूर येथील प्रादेशिक संशोधन केंद्रामार्फत प्रसारित करण्यात आल्या आहेत. कावेरी दोआबातील बागाईत जमिनी चार महिने पडीक असतात. त्या काळात पी. आर. एस.–७२ या जातीच्या कापसाची लागवड करता येणे शक्य असल्याचे आढळले आहे. शिवाय, जिराईत जमिनीत लागवड करण्यासाठी "रेवा बी-५०" या नवीन जातीचे संशोधन झाले असून दर हेक्टरला १५ ते १६ क्विंटल कपाशीचे उत्पादन येऊ शकेल.

कापूस खरेदीचे दर मध्यवर्ती सरकारने ठरवावयाचे व कापूस महामंडळाने खरेदीचा पूर्ण ताबा घेतल्यावर त्यांचा प्रतिनिधी म्हणून काम करावयाचे, या अटीवर महाराष्ट्र सरकारच्या एकाधिकार कापूस खरेदी बिलाला मध्यवर्ती सरकारकडून मान्यता मिळाली आहे. कापूस व्यापारातील मान्यवर तज्ज्ञ लोकांचा एकाधिकार कापूस खरेदी कार्यक्रमात समावेश करून घेण्याच्या क्षमतेवर या कार्यक्रमाचे यश अवलंबून राहील.

---

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. 'स्वस्तिक'मध्ये विलीन

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. मधील विलिनीकरणास मुंबई हायकोर्टाने २७ सप्टेंबर, १९७१ रोजी मंजुरी दिली. कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, कडून ३१ डिसेंबर १९७१ रोजी ह्या विलिनीकरणास संमती आली आहे. म्हणजे, ३१ डिसेंबर, १९७१ ही विलिनीकरणाची व्यावहारिक दृष्टीने तारीख आहे. अशा तऱ्हेचे भारतामधील हे पहिलेच विलिनीकरण आहे.

'स्वस्तिक'च्या मुख्य कचेरीकडून दि महाराष्ट्र बँक लि.च्या सर्व भागधारकांना पत्रे रवाना होत आहेत. त्या पत्रात 'स्वस्तिक'चे इक्विटी शेअर्स व डिबेंचर्स मिळण्यासाठी त्याचप्रमाणे बँकेच्या शेअर्सची रोख रक्कम मिळण्यासाठी महाराष्ट्र बँकेच्या भागधारकांना तपशीलवार मार्गदर्शन केलेले असेल.



'स्वस्तिक'चे चेअरमन, श्री. शंतनुराव किर्लोस्कर, ह्यांस दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. तर्फे श्री. एम. पी. चितळे हे बँकेची सर्व जिंदगी रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट देऊन सुपूर्त करीत आहेत.

### बांगला देशातील बँक खाती

बांगला देश सरकारने बँकेतील खाती, लॉकर्स, सेफ डिपॉझिट आणि सेफ कस्टडी जिनसा, ह्या संबंधात सूचना जाहीर केल्या आहेत. पुनः नवीन सूचना मिळेपर्यंत लॉकर्स, सेफ डिपॉझिट आणि सेफ कस्टडीच्या जिनसा ह्यांचे व्यवहार बंद राहतील. पाकिस्तानी फौजांची खाती कुणालाही चालविता येणार नाहीत. पाकिस्तानी सैनिकांची खातीही बंद राहतील. २६ मार्च, १९७१ आणि १६ डिसेंबर, १९७१ ह्याचे दरम्यान जी बँक खाती, लॉकर्स, सेफ कस्टडी जिनसा, सेफ डिपॉझिट शेअर्स, रोखे इत्यादी मार्शल लॉखाली गोठवून टाकली होती, ती खुली केली जातील. बांगला देशचा रुपया पौंड स्टर्लिंगशी जोडला जाणार आहे. १८·९५ रुपये = १ पौंड असा हुंडावळीचा दर राहील.

### दिनांक १ जानेवारीपासून २ रु. किलो भावाने साखर

घरगुती कार्डधारकांना दिनांक १ जानेवारी १९७२ पासून २ रु. किलो या भावाने ठराविक साखर कोटा उपलब्ध करून देण्याची शासनाने व्यवस्था केली आहे.

मुंबई, पुणे, नागपूर व सोलापूर या शहरात साखरेचे प्रमाण प्रत्येक प्रौढास दरमहा २ किलो व १ हजार अथवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्येच्या इतर शहरात साखरेचे हे प्रमाण १ किलो राहील, तर ह्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी हेच प्रमाण अर्धा किलो असे राहील.

यासाठी महाराष्ट्रातील साखरकारखाने दरमहा केंद्र सरकारकडून मुक्त होणाऱ्या साखरेपैकी ६० टक्के साखर राज्य सरकारला देतील. भारत सरकारची अशी इच्छा आहे की, उरलेली ४० टक्के साखरही अशा तऱ्हेने विकली जावी की, जेणेकरून साखरेचा किरकोळ विक्रीचा दर रु. २.३० ते २·३५ राहील. अशा साखरेस अखिल भारतीय व्यापारी पेठ खुली असल्याकारणाने अखिल भारतीय पातळीवर एक योजना अखावी लागेल.

### आर्थिक संस्थांना १३८ कंपन्यांच्या बोर्डांवर प्रतिनिधित्व हवे.

आय. डी. बी. आय., आय. एफ. सी., युनिट ट्रस्ट, इत्यादी पब्लिक सेक्टरमधील आर्थिक संस्थांनी ५० लक्ष रु. पेक्षा जास्त ऑर्डिनरी भाग भांडवल असणाऱ्या १३८ कंपन्यात आपले भांडवल गुंतविलेले आहे. त्याचे प्रमाण २५% पासून ३५% पर्यंत आहे. कर्जे व इतर मदत हिशोबात घेतली तर त्यांच्या हितसंबंधाचा हिस्सा ४०% ते ७५% होतो. ह्या कंपन्यांच्या संचालक मंडळावर आपला प्रतिनिधी असावा, अशी त्या आर्थिक संस्थांनी मागणी केली आहे. ह्या १३८ कंपन्यात ४ ॲल्युमिनमच्या, ६ सिमेंटच्या, ९ वीज उत्पादनाच्या, ४० इंजिनिअरिंगच्या आणि ३ कोळशाच्या कंपन्या आहेत. टिस्को, टेल्को, इत्यादी कंपन्यांचाही ह्या १३८ कंपन्यात समावेश आहे. मदत घेणाऱ्या कंपन्यांचा कारभार चांगला चालावा, उत्पादन वाढावे, सामाजिक न्याय मिळावा, हा प्रस्तुत मागणीमागे हेतू आहे.

### दक्षिण भारतातील चित्रपट निर्मिती

दक्षिण भारतातील फिल्म कंपन्यांनी १९७१ मध्ये उत्पादनाचा उच्चांक गाठला. तेलुगू आणि मल्याळी चित्रपटांच्या निर्मितीत १५ ते २०% वाढ झाली; तामीळ आणि कन्नड चित्रपटांची निर्मिती कमी झाली. हिन्दी चित्रपट निर्मितीत फरक पडला नाही. दक्षिण भारतात एकूण २५१ चित्रपट सेन्सॉर झाले. त्यांपैकी ५२ रंगीत होते. १९७० मध्ये त्यांची संख्या अनुक्रमे २४१ आणि ३५ होती. एकूण २५१ चित्रपटांपैकी २०५ तामीळनाडूत आणि आंध्र प्रदेशात तयार झाले होते.

## न्यूयॉर्कमध्ये स्टेट बँकेची शाखा सुरू झाली

स्टेट बँक ऑफ इंडियाने न्यूयॉर्क येथे ८ डिसेंबर रोजी शाखा उघडली आहे. स्टेट बँकेची अमेरिकेत उघडली गेलेली ही पहिलीच शाखा आहे. या शाखेच्या उद्घाटनासाठी स्टेट बँकेचे अध्यक्ष श्री. आर. के. तलवार हे मुद्दाम मुंबईहून विमानाने येथे गेले. न्यूयॉर्कच्या १५० व्यापाऱ्यांना व उद्योगपतींना श्री. तलवार यांनी सांगितले की, न्यूयॉर्क येथील आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारात आपला वाटा उचलण्यास स्टेट बँकेला आनंद वाटतो. भारत आणि अमेरिका या देशांतील व्यापार उद्योगास आवश्यक ती माहिती व सहकार्य स्टेट बँक देईल, असेही त्यांनी सांगितले. फर्स्ट नॅशनल सिटी बँकेचे अध्यक्ष श्री. विल्यम स्पेन्सर यांनी या वेळी भाषण करून स्टेट बँकेच्या शाखेस शुभेच्छा व्यक्त केल्या.

## महिला जॉकींच्या घोड्याच्या शर्यती

घोड्यांच्या शर्यतीत भाग घेण्यास महिला जॉकींना ग्रेट ब्रिटनमधील जॉकी क्लबने मान्यता दिली आहे. महिला जॉकींच्यासाठी खास शर्यती आयोजित केल्या जातील; पुरुषांच्या बरोबरीने त्या जॉकी म्हणून काम करू शकणार नाहीत. लोकांची प्रतिक्रिया लक्षात घेऊन महिला जॉकींच्या शर्यती वाढवावयाच्या किंवा नाही ते ठरविले जाईल. महिला जॉकींच्या रेसेस केवळ नावीन्य म्हणून काही काळच लोकप्रिय होतील, का त्यांची लोकप्रियता टिकून राहील हे लवकरच समजेल.

## वेतन वाढले पण राहणी घसरली

१९६३ ते १९६९ ह्या मुदतीत कारखान्यातील कामगारांच्या वेतनाचा इंडेक्स नंबर १०९ वरून १६२ वर गेला म्हणजे त्यांचे वेतन ४८% ने वाढले. पण वेतनाने खरीदल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष जिनसांचा इंडेक्स नंबर १०३ वरून ९५ वर उतरला म्हणजे, व्यवहारतः सुमारे ८% ने त्याची राहणी कनिष्ठच झाली.

## हौशी प्रवाशांसाठी कुलू खोऱ्याचा विकास

हिमाचल प्रदेशातील कुलू खोऱ्याचा हौशी प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी विकास करण्यात येणार आहे. पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात ह्या कामासाठी मध्यवर्ती सरकार ३ कोटी रुपये खर्च करणार आहे. राज्य सरकारही ह्या कामासाठी खर्च करणार आहे. मध्यवर्ती सरकारचे प्रवासी खाते विकासाची एक मोठी योजना तयार करणार आहे. मनाली ह्या रम्य ठिकाणी प्रवाशांना राहण्यासाठी आरामशीर बंगले बांधण्यात येणार आहेत. बंगल्यासाठी २० लाख रुपये खर्च करण्यात येतील. मनालीप्रमाणेच इतरही रमणीय ठिकाणे अधिक आकर्षक करण्यात येणार आहेत. ह्या कामासाठी लागणारा पैसा आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून कर्जाऊ घेण्यात येणार आहे.




® इंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविला आहे. Tom & Bay/KO-7182-M

## मराठा चेंबरतर्फे कारखानदारांची अल्पबचत योजनेत गुंतवणूक

देशाच्या युद्धप्रयत्नातील आपला वाटा म्हणून मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजने आपल्या सभासदांतर्फे अल्पबचत योजनेत वीस लाख रुपये गुंतविण्याचे ठरविले आहे. यासंबंधी सभासद कारखानदारांना चेंबरने आवाहन केले असून कारखान्यातील अधिकारी वर्गानी एक महिन्याचा पगार, कामगारांनी प्रत्येकी किमान १० रुपये आणि कंपन्यांनी आपल्या एकंदर उलाढालीच्या प्रमाणात काही रक्कम अल्पबचतीत गुंतवून या राष्ट्रीय कार्यातील आपला वाटा उचलावा अशी विनंती केली आहे. या विनंतीला सभासदांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत सुमारे दहा लाखावर रक्कम गोळा झाली आहे.

---

## इतिहासाची आठवण देणारा क्षण

भारत-पाक युद्धात हिंदी फौजांनी सिंधमधील नया चोर हे ठिकाण काबीज करण्याचा डाव केला. थर वाळवंटांत हे ठिकाण आहे. त्याच्या दक्षिणेस हिंदी फौजांनी उमरकोट शहराजवळ मुसंडी मारली होती. उमरकोट हे महत्त्वाचे रस्त्यावरील नाके असून त्या ठिकाणी रजपुतांनी बांधलेला एक किल्ला आहे. ह्या ठिकाणी अकबर बादशहाचा जन्म झाला असे म्हणतात. हुमायूनचा शेरशहा सुरीने पराभव केल्यावर त्याने १५४० साली उमरकोटच्या राण्याकडे आश्रय घेतला होता. तेथेच त्याला पुत्र-प्राप्ती झाली. चोर–उमरकोटच्या पश्चिमेला थरचा ओसाड प्रदेश संपतो. त्या पुढील प्रदेश कालव्याच्या पाण्याने ओलिताखाली आलेला आहे. सक्करच्या धरणाच्या पाण्याने भूमी सुपीक झाली आहे. हे धरण १९३२ साली बांधण्यात आले. त्याचे मूळचे नाव ' लॉइड धरण ' असे आहे.

---

## बांगला देशाशी अधिक मोठी सरहद्द

मुक्त झालेल्या बांगला देशाशी भारताची ३,९५० किलोमीटर लांबीची सरहद्द आहे. ह्या उलट भारताच्या पश्चिम पाकिस्तानशी असलेल्या सरहद्दीची लांबी २,९६६ किलोमीटर आहे. बांगला देशाशी असलेल्या सरहद्दीचा तपशील असा आहे. पश्चिम बंगाल–बांगला देश २,१५८ किलोमीटर; त्रिपुरा–बांगला देश ८०० किलोमीटर; आसाम–मेघालय-बांगला देश ९९२ किलोमीटर. पश्चिमेला पश्चिम पाकिस्तान आणि राजस्थान ह्यांच्यातील सरहद्द सर्वात अधिक लांबीची म्हणजे १,०३० किलोमीटर इतकी आहे. जम्मू-काश्मीर-पाकिस्तान सरहद्द ९३१ किलोमीटर; पंजाब-पाकिस्तान ५४९ किलोमीटर; आणि गुजरात पाकिस्तान सरहद्द ४५६ किलोमीटर आहे.

---


**THE BELGAUM BANK LIMITED**

Estd. 1930

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

Working Funds : Over Rs. 7 Crores

Share Capital & Reserves : Over Rs. 17 Lacs

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lockers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT, *General Manager.* K. B. KIRTIKAR, *Chairman.*







**GADRE BROTHERS**

ENGINEERS & FOUNDERS

MADHAVNAGAR (S. Rly.)

Phone : 318 Sangli Gram : 'SEWA Madhavnagar

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मनेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने बंडाखा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. गाउन्स, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेरिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

Madison/TGM/7 Mar


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिलें व 'दुर्गाभिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)